**नियमित दिवाणी दावा क्र. ३२/२०२०**
**नि. क्र. ४८ लगत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०३ रामेश्वरलाल बन्सीलाल बावरी यांचा उलटतपास शपथेवर, प्रतिवादीतर्फे विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांच्याकडून</u> –**

**(साक्षीदाराने नमूद केले की, त्याला मराठी पूर्णतः समजत नाही. तो मराठीतून बोलू शकत नाही. सबब, साक्षीदारास हिंदी भाषेतून प्रश्न विचारण्यात येत आहेत. साक्षीदाराने दिलेली उत्तरे मराठी भाषेत नोंदवून घेत आहोत. यासाठी हरकत नसल्याचे दोन्ही बाजूंचे विधीज्ञ यांनी नमूद केले. सबब, येणेप्रमाणे, साक्ष नोंदविण्यात येत आहे).**

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, मला मराठी लिहिता येत नाही व वाचताही येत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मराठी वाचू शकतो परंतू ती समजण्यास मला अडचण जाते. माझे मराठीतील प्रतिज्ञापत्र आमच्या वकील साहेबांनी मला भाषांतरीत करुन समजावून सांगितले. मला त्यांनी भाषांतरीत करताना जे सांगितले तो भाषांतरीत केलेला हिंदीतील मजकूर लिखीत नाही.

**१६.** 'मला बँक ऑफ इंडीया या संस्थेमार्फत दावा दाखल करण्याचा व त्या अनुषंगाने साक्ष देण्याचा अधिकार होता व आहे' या माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील विधानाबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी जोडलेला नाही. रिझर्व बँकेच्या आदेशानुसार देय झालेले व्याज कर्जदाराच्या खाती खर्च लिहिलेले नसले तरी ती रक्कमही देण्यास प्रतिवादी जबाबदार आहेत, असे दर्शविण्यासाठी रिझर्व बँकेच्या आदेशाचा कोणताही दस्त मी या प्रकरणी सादर केलेला नाही.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २८/०२/२०१९ रोजीच्या नोटीसबाबत मला व्यक्तीशः काही माहित नाही. मी कर्ज खाते क्रमांक व कर्जदाराकडे थकीत कर्जाची रक्कम या आता सांगू शकत नाही कारण आम्ही दाखल केलेले विविध दावे आहेत व त्यात पुष्कळ कर्जदार व पुष्कळ कर्ज खाते क्रमांक आहेत. २०१७

साली माझी कडवई शाखेतून बदली झाल्यानंतर प्रतिवादीच्या कर्ज खात्यात त्यानंतर पुन्हा काय व्यवहार झालेत याबाबत मला व्यक्तीशः काही माहिती नाही. प्रेमसागर गुप्ता यांच्याशी माझी व्यक्तीगत ओळख नाही, माझी कडवई शाखेतून बदली झाल्यानंतर ते तेथे शाखाधिकारी म्हणून रजू झाले.

**१८.** फौजदारी खटला क्र. १६/२०१९ बाबत मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, फौजदारी खटला क्र. १६/२०१९ या प्रकरणी प्रतिवादीच्या कर्जप्रकरणासंबंधीचे सर्व दस्त परीक्षणकामी मुख्य दस्तऐवज परीक्षक यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करतेवेळी मी प्रतिवादीच्या कर्ज खात्यासंबंधीचे कोणतेही मूळ दस्त पाहिले नाही.

**१९.** हे म्हणणे खरे नाही की, कर्ज मिळण्यासाठी व्यक्ती आमच्या कडवई शाखेत येत होते त्यावेळी कर्ज मागणी अर्ज मधील मजकूर आमचे बँक कर्मचारी भरत होते, साक्षीदार सांगतो की, संबंधीत कर्जदार तो मजकूर भरत असे. हे म्हणणे खरे आहे की, डिमांड प्रॉमीसरी नोट मधील मजकूर आमचे बँक कर्मचारी भरत असत.

**२०.** कर्ज मागणी व कर्ज मिळविण्यासंबंधीचे सर्व दस्त हिंदी अगर इंग्रजी भाषेतच होती, या तुमच्या सुचनेबाबत माझे सांगणे की, सदरचे दस्त हिंदी व इंग्रजी अथवा मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये होती. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज मागणी करणाऱ्या ज्या अर्जदारास स्वाक्षरी करता येत नसे, त्याच्या अंगठयाचा ठसा आम्ही उमटवून घेत असूत. कर्ज मागणी करणाऱ्या व्यक्तीला हिंदी किंवा इंग्रजी भाषा येते अगर कसे याबाबत आम्ही संबंधीतांना विचारत होतो. हे म्हणणे खरे आहे की, २०१६ ते २०१९ या कालावधीत कडवई शाखेकडून जे कोणते कर्ज प्रकरणे झाले त्या कोणत्याही कर्ज प्रकरणात जर संबंधीताला हिंदी अथवा इंग्रजी भाषा येत नसेल तर मराठीतून मजकूर समजावला असे कोणत्याही प्रकरणातील कोणत्याही दस्तात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सोने तारण कर्ज मिळण्यासाठी संबंधीतांकडून

अर्ज प्राप्त झाल्यावर त्याबाबतीत पडताळणी करण्याची शाखाधिकारी म्हणून माझी जबाबदारी होती. हे म्हणणे खरे नाही की, सोने म्हणून जी वस्तू आणली आहे ती सोनेच आहे याबाबतही खात्री करण्याची जबाबदारी शाखाधिकारी म्हणून माझीच होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने कर्जाची रक्कम कधीपर्यंत परतफेड केली हे माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज रकमेपैकी किती रक्कम प्रतिवादीने परत केली हे सुध्दा माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही.

**२१**. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेल्या वस्तू कशाप्रकारे बँकेत ठेवण्यात आल्या होत्या व त्याबाबत सुरक्षासंबंधीने काय दक्षता घेण्यात आल्या याबाबत माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेल्या सोन्याच्या वस्तू बँकेतील सेफ लॉकरमध्ये ठेवल्या जातात, साक्षीदार पुन्हा सांगतो की, कॅश व्हॉल्ट मध्ये त्या वस्तू ठेवल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, तेथे सोने ठेवते वेळी व त्यातून बाहेर काढतेवेळी कॅश व्हॉल्ट वापरण्यासंबंधी संबंधीत नोंदवहीला नोंद केली जाते.

**२२**. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर मला हिंदी भाषेत समजावून सांगण्यात आला असे मी प्रतिज्ञापत्रातील प्रतिज्ञालेखात खोटेच नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.01.10 17:30:13 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक १०.०१.२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 10/01/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 10/01/2025 |
| Evidence uploaded on | :- | 10/01/2025 |